# शेळ्यांचे आहार व्यवस्थापन

प्रा. निखिल सोनोने
सहाय्यक प्राध्यापक
कृषी महाविद्यालय, गेवराई तांडा

प्रा. वर्षा भोपळे
सहाय्यक प्राध्यापक
एम. जी. एम. नानासाहेब कदम कृषी महाविद्यालय, गांधेली

शेळी पालन व्यवसायामध्ये जवळपास ६० ते ७० टक्के खर्च हा शेळ्यांच्या आहार व्यवस्थापनावर होत असतो. त्यामुळे उत्पादन खर्च नियंत्रणात ठेवण्याकरिता शेळ्यांच्या खाद्य व आहार व्यवस्थापनावर विशेष लक्ष देणे गरजेचे असते. शेळीचे उत्पादन व उत्पादक उपयुक्त आयुष्य वाढवण्यासाठी शेळ्यांना "संतुलित आहार" देणे फायदेशीर ठरते. साधारणतः आहाराचे दोन मुख्य प्रकार आहे एक म्हणजे पोषण आहार आणि दुसरे म्हणजे उत्पादन आहार. पोषण आहार ही शरीराची प्राथमिक गरज आहे तिची पूर्तता झाल्यावरच आहारातील उर्वरित अन्न द्रव्य उत्पादन कार्यासाठी वापरली जातात त्याला उत्पादन आहार असे म्हणतात. त्याचे प्रमाण उत्पादनाचा प्रकार, प्रमाण व गुणवत्ता यावर अवलंबून असते. पोषण आहाराची पूर्तता केल्याशिवाय आहारातील अन्नद्रव्य उत्पन्नासाठी उपलब्ध होत नाहीत. शेळ्या या उत्पादनासाठीच जोपासल्या जात असल्यामुळे त्यांना शरीर पोषण व उत्पादनासाठी आहार द्यावा लागतो. त्यामुळे भाकड शेळ्या पेक्षा गाभण, दुबत्या, प्रजननातील, नर आणि वाढत्या वयातील करडांना वजनाच्या प्रमाणात अधिक आहाराची आवश्यकता असते.

### शेळ्यांना लागणारे अन्न-घटक खालीलप्रमाणे:

- प्रथिने
- कर्बोदके
- स्निग्ध पदार्थ
- जीवनसत्वे
- खनिजे
- पाणी

शारीरिक संतुलन व उत्पादन क्षमता टिकून ठेवण्यासाठी शेळ्यांना वरील सर्व अन्न घटकांची आवश्यकता असते. त्यामुळे आपल्याला शेळ्यांच्या दररोजच्या आहारामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या चाऱ्याचा/वैरणीचा (सुका/हिरवा), खुराकीचा समावेश करणे आवश्यक असते.

### वाळलेली वैरण:

वाळलेल्या वैरणी मध्ये तंतु मय पदार्थ, विद्राव्य खनिज क्षार, जीवनसत्त्व''ड''चे प्रमाण अधिक तर प्रथिने, स्निग्ध पदार्थ, पिष्टमय पदार्थ क्षार जीवनसत्त्व''अ''चे प्रमाण कमी असते. त्यामुळे यामधील अन्न घटकाची पाचकता व उपलब्धता कमी असते. अशा वैरणीचा उपयोग फक्त शरीर पोषणासाठीच उपयोग होतो. उत्पादन कार्यासाठी वाळलेल्या वैरणीचा कमी उपयोग होतो. वाळलेल्या वैरणीमध्ये ज्वारीचा कडबा, मका कुटी, हरभरा भुसा, उडीद भुसा, सोयबीन भुसा, तूर भुसा इत्यादी प्रकारच्या चाऱ्यांचा समावेश होतो.

### हिरवी वैरण:

शेळ्यांकरिता हिरवी वैरण एकदल व द्विदल या दोन वर्गातील चारा पिकांपासून प्राप्त होते. एकदल चारा पिकांमध्ये मका, ज्वारी, बाजरी, ओट इत्यादीचा समावेश होतो. एकदल चारा पिकांमध्ये कर्बोदकाचे प्रमाण अधिक असून ते शेळ्यांच्या शरीर पोषणासाठी व उत्पादनासाठी उत्तम असते. द्विदल वर्गातील चारा पिकांमध्ये बरसिम, लसुनघास, दशरथ गवत, शेवरी, चवळी, स्टायलो इत्यादी चारा पिकांचा समावेश होतो. त्यांच्यामध्ये खनिजव प्रथिनांचे प्रमाण अधिक असते. द्विदल प्रकारातील हिरवी वैरण जास्त वापरल्यास दैनंदिन शेळ्यांच्या आहारामधील खुरकाचे प्रमाण थोडे कमी करता येते.

### झाडपाला:

शेळ्या झाडपाला खुप आवडीने खातात. झाडांच्या पाल्यामध्ये खनिजांचे आणि प्रथिनांचे प्रमाण अधिक असल्याने शेळीला आवश्यक ती पोषणमुल्ये सहज मिळतात. शेळ्या बाभुळ, पिंपळ, सुबाभुळ, चिंच, अंजन, खैर, बोर, शेवगा, बांबू आदि झाडांचा पाला अगदी आवडीने खातात. यामुळे शेळी पालकांचा थोड्याफार प्रमाणात हिरव्या चाऱ्याचा ही प्रश्न सुटतो.

### खुराक:

शेळ्यांना शारीरिक क्रिया व उत्पादन क्षमता सातत्याने टिकून ठेवण्यासाठी दररोजच्या आहारामध्ये शेळीच्या वयानुसार आणि उपयुक्ततेनुसार खुरकीचा समावेश करणे महत्त्वाचे ठरते. शेळ्यांना खुराकीमध्ये शेंगदाणा पेंड, सूर्यफूल पेंड, सरकी पेंड, त्याचबरोबर ज्वारी, मक्का, गहू इत्यादिच्या दाण्याचा स्वतंत्र भरडा किंवा एकत्रितपणे आपण देऊ शकतो.

### पाणी:

शेळ्यांना शरीराचे तापमान आणि पचनक्रिया सुरळीत ठेवण्यासाठी पिण्यासाठी स्वच्छ व ताजेपाणी देणे महत्त्वाचे आहे. विशेषतः उन्हाळ्यात शेळ्यांना थंड व ताजे पाणी मुबलक प्रमाणात देणे गरजेचे असते. पाण्याच्या कमतरतेमुळे शेळ्यांचे खाद्याचे सेवन कमी होऊ शकते आणि एकूणच आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात.

### शेळ्यांचे वेगवेगळ्या अवस्थेमधील आहार व्यवस्थापन थोडक्यात:

### करडांचा आहार:

करडांना जन्मल्यानंतर दोन तासांच्या आत वजनाच्या १०% चीक पाजणे महत्त्वाचे असते. जेणेकरून त्या चीकामध्ये उपलब्ध असणाऱ्या पोषक घटकांचा करडांची

रोगप्रतिकार शक्ती वाढविण्यास मदत मिळते. करडांना पोट भर दूध पिण्याची सवय लावावी. हळुहळु करडांना झाडपाला, लुसलुशीत हिरवे गवत, सुका चारा व खुराक रोजच्या आहारा देण्यास सुरुवात करावी.

### प्रौढ शेळीचा आहार:

साधारणपणे शेळी २० ते ३० किलो सरासरी वजनाची झाल्यावर ती विकली जाते. या कालावधीत शारिरीक वाढ दर फार कमी असतो आणि निर्वाहा आहार पोषक तत्वांची आवश्यकता पूर्ण करते. फिनिशर खाद्यात पाचक प्रथिने ५ ते ६ % आणि पचनिय पोषक घटक ६० ते ६५ % आसावेत. चरबीयुक्त मांस उत्पादनाकरीता जोपासलेल्या जनावराचे आहारात एकूण कोरड्या चाऱ्याच्या ३० ते ४० % भरडा चारा असावा. याउलट चरबी नसलेल्या मांस उत्पादनाकरीता एकूण कोरड्या चाऱ्याच्या २० ते २५ % भरडा चारा असावा. चरबीयुक्त मांस उत्पादनाकरीता, उच्च ऊर्जा असलेल्या धान्यांचा पोषकद्रव्ये मिश्रणात समावेश करावा.

### गाभण शेळ्यांचा आहार:

गर्भाच्या एकूण विकासाच्या ७० ते ८० % वाढ गर्भावस्थेच्या शेवटच्या ५० दिवसात होत असल्यामुळे या काळात तिच्या आहाराची काळजी घेणे फार गरजेच आहे. प्रथिने, कॅल्शियम आणि स्फुरदाची गरज या कालावधीत वाढलेली असते. त्यामुळे दररोज १५० ग्रॅम देखभाल रेशनाच्या व्यतिरिक्त २५ टक्के पाचक प्रथिने व ५५ ते ६० % पचनिय पोषक घटक असलेला ३०० ते ५०० ग्रॅम आहार गाभण शेळीला द्यावा. पण गाभण परंतु दूध देणाऱ्या शेळ्याकरीता ३०० ते ४०० ग्रॅम खुराक मिश्रण/किलो दूध उत्पादनासाठी द्यावे. खनिज चाटन उपलब्ध करून देण्यात यावे.

### दुधाळ शेळ्यांचा आहार:

प्रौढ स्तनपान करणाऱ्या मादी शेळीसाठी दररोज १५० ग्रॅम निर्वाह रेशनाच्या व्यतिरिक्त खुराक मिश्रण ४०० ग्रॅम १ लिटर दूध उत्पादनामागे दिले जाणे आवश्यक आहे. स्तनपान करणाऱ्या शेळ्यांच्या खुराक मिश्रणात ९ ते १२ % पाचक प्रथिने आणि ६० ते ६५ % पचनिय पोषक घटक असायला हवे.

### भाकड शेळ्यांचा आहार:


पुरेशी कुरणे सुविधा उपलब्ध असल्यास, भाकड शेळ्या पुरेश्या तास चरल्यास निर्वाह रेशनाची पुर्तता होते. तथापि, कुरणे सुविधा उपलब्ध नसल्यास २०० ग्रॅम खुराक मिश्रण ५ ते ६ % पाचक प्रथिने आणि ५५ ते ६० पचनिय पोषक घटकासह मिश्रण द्यावे.

### प्रजननासाठी उपयोगात येणाऱ्या शेळी व बोकडांचा आहार:

बहुतेक नर आणि मादी पिल्लाची निवड प्रजननाच्या उद्देशसाठी केली जाते. त्यांना पुनर्स्थित साठा/कळप म्हटले जाते. वयाच्या एक वर्षात लैंगिक परिपक्वता आणि शरीराचं इच्छीत वजन गाठण्याकरीता पुनर्स्थित साठाचे योग्य आहार देणे गरजेचे आहे. लहान जातीच्या एक वर्षापर्यंतच्या शेळीचे शाररीक वजन १५ ते १८ किलो असावे. तसेच मोठ्या जातीच्या शेळ्यांचे वजन २० ते २५ किलो असावे. दर्जेदार पुरेसे कुरणे उपलब्ध असतात तेव्हा अतिरीक्त खुराक देणे आवश्यक नाही. परंतु सडपातळ शेळीस २५० ते ५०० ग्रॅम खुराक मिश्रण १० ते १२ % पाचक प्रथिने आणि ६८ ते ७० % पचनिय पोषक घटक पुरवणे गरजेचे आहे. खुराक मिश्रणात अपरिहार्यपणे खनिज मिश्रण द्यावे किंवा खनिज चाटन गोठ्या मध्ये असावी. बोकड म्हणजे प्रजोत्पादनाच्या उद्देशाने जोपासलेल्या नर त्यांला एकूण वजनाच्या ३.० ते ३.५ टक्के खुराक मिश्रण आवश्यक आहे. सरासरी प्रजनना करीता नरांना ५०० ग्राम ते एक किलो खुराक आणि एक ते दोन वर्षादरम्यान वयाच्या करडांना २५० ग्रॅम खुराक आवश्यक आहे.

(संपर्क: +९१ ९९२१५१५१७९)

★ ★ ★



दुधावरिली साय निवडुनि दिधली।
तैसी परी जाली आम्हां तुम्हां ॥१॥
धालों मी ब्रह्में उदार सब्रह्में।
अनुदिनीं प्रेमें डुल्लतसे ॥२॥
नाठवे आशा देहावरी उदास।
मीतूंपण भाष चोजवेना ॥३॥
रखुमादेविवर विठ्ठलीं मुरोनि राहिला।
तो आनंदु देखिला संतजनीं ॥४॥

अर्थ: दुधांमध्ये सारभूत जसी साय असते. व ती काढून जसी हातावर द्यावी त्या प्रमाणे सर्व संसारात सारभूत जो परमात्मा त्याची प्राप्ती आज आपल्याला झाली आहे. परमात्मस्वरुपाने तृप्त होऊन कृत्यकृत्यतेचे उदगार तोंडातून निघतात. आम्ही रात्रंदिवस त्या प्रेमांत डोलत आहोत.अशा स्थितीत आशेचा आठवच नाही. देहावर उदासीनता येते. आणि मी, तूं पणाचा द्वैतभाव जाणवत नाही. रखुमादेवीचे पती जे श्रीविठ्ठल त्यांच्या आनंदात आम्ही कसे डोलत आहोत हे एक, साधुसंतानाच माहित आहे. असे माऊली सांगतात.